(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

[२०२३] ३ एस. सी. आर. १२

भूसंपादन जिल्हाधिकारी

वि.

जय प्रकाश त्यागी आणि इतर

(दिवाणी अपील क्र. १३००/२०२३ )

फेब्रवारी २४, २०२३

**[ न्या. एम. आर. शाह आणि न्या. सी. टी. रविकुमार ]**

*भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहात करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ - कलम २४ (२) – पुणे महापालिका आणि इतर वि. हरकचंद मिसिरीमल सोळंकी आणि इतर यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवून उच्च न्यायालयाने प्रश्नापद संपूर्ण जमिनीच्या बाबतीतली संपांदनाची कार्यवाही कलम २४(२) अन्वये व्यपगत झाल्याचे मानले असल्याचे जाहीर केले - भूसंपादन जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने हे एक विशिष्ट प्रकरण होते की, जमिनींच्या काही भागाचा ताबा स्थगितीमुळे घेऊ शकता आला नाही - निर्णय - असे असूनही आणि प्रत्यक्ष ताबा घेण्याच्या वादात न जाता, उच्च न्यायालयाने प्रामुख्याने पुणे महानगरपालिका प्रकरणावर भिस्त ठेवत आक्षेपार्ह आदेश पारित केला - सदर प्रकरणातील निर्णय इंदूर विकास प्राधिकरण वि. मनोहरलाल आणि इतर या प्रकरणातील*

*घटनापीठाकडून नामंजूर करण्यात आला - त्यात नमूद केलेला कायदा सध्याच्या प्रकरणाला लागू करताना, उच्च न्यायालयाने संपूर्ण जमिनी संदर्भातील संपादनाची कार्यवाही व्यपगात झाल्याचे मानले गेले असल्याचे जाहीर करून महत्त्वाची चूक केली - प्रस्तुत जमिनीच्या संपादन प्रक्रियेच्या बाबतीत कोणतेही मानीव व्यपगात होणार नाही -आक्षेपार्ह आदेश रद्द करण्यात आला.*

*इंदूर विकास प्राधिकरण विरुद्ध मनोहरलाल आणि इतर*
**(२०२० ) ८ एससीसी १२९ : [२०२०] ३ एससीआर १ -**
**अनुसरले.**

*पुणे महानगरपालिका आणि इतर वि. हरकचंद मिश्रीमल सोळंकी आणि इतर* **(२०१४) ३ एससीसी १८३ : [२०१४] १ एससीआर ७८३ – संदर्भित.**

**<u>निर्णय विधी संदर्भ</u>**

| | |
|---|---|
| **[२०१४] १ एससीआर ७८३** | **परी. २ येथे संदर्भ.** |
| **[२०२० ] ३ एससीआर १** | **परी. ३ येथे अनुसरले.** |

दिवाणी अपिल अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक १३००, २०२३.

नवी दिल्ली येथील दिल्ली उच्च न्यायालयाची रिट याचिका (सी) क्रमांक २१९८/२०१५ मधील न्यायनिर्णय आणि आदेश दि. ०६.०७.२०१५ वरून.

कु. आस्था त्यागी, दिनेश चंदर त्रेहान, अपीलकर्त्याचे वकील.

अनिल कुमार शर्मा, अपूर्व शर्मा, अनुज शर्मा, अर्चित उपाध्याय, कु. चारु शर्मा, कु. मनिका त्रिपाठी, कु. ईशान शर्मा, आशुतोष कौशिक, मनीष वशिष्ठ, उत्तरवादींसाठी वकील.

**एम. आर. शाह न्या.** यांनी दिलेल्या न्यायालयाचा न्यायनिर्णय -

१. नवी दिल्ली येथील दिल्ली उच्च न्यायालयाने रिट याचिका (सी) क्रमांक २१९८/२०१५ मध्ये दिलेला आक्षेपार्ह न्यायनिर्णय आणि आदेशाबद्दल व्यथित आणि असमाधानी वाटल्यामुळे, ज्याद्वारे उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका मंजूर केली आहे आणि खसरा क्रमांक ३५/२/२ (६-०४) ३६ /२ /२ /(४-१३ ) आणि ४०/२/२ (५-०१ ), एकूण क्षेत्र १५ बीघा १८ बिस्वा, वजिराबाद गावातील महसुली मालमत्तेत असलेल्या जमीनी मध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तुत विषयांच्या जमिनींसंदर्भातील संपादन कार्यवाही भूसंपादन, पुनर्वसन आणि *पुनर्वसाहात करताना उचित भरपाई मिळण्याचा* आणि पारदर्शकतेचा अधिकार अधिनियम, २०१३ च्या कलम २४ (२ ) अन्वये (यापुढे "अधिनियम, २०१३" असे संदर्भित केले आहे.) व्यपगत झाली असल्याचे जाहीर केले आहे, आणि म्हणून भूसंपादन जिल्हाधिकारी, नवी दिल्ली यांनी सदरचे अपील दाखल केले आहे.

२. उच्च न्यायालयाने पारित केलेला आक्षेपार्ह न्यायनिर्णय व आदेश आणि एलएसी (भूसंपादन जिल्हाधिकारी) यांच्यावतीने उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या

प्रतिप्रतिज्ञापत्रावरून असे दिसते की, एलएसीच्या वतीने हे स्पष्ट प्रकरण होते की, खसरा क्रमांक ३५/२/२, क्षेत्र ६ बीघा ०४ बिस्वा चा ताबा २२.०९.१९९७ रोजी घेण्यात आला होता; खसरा क्रमांक ३६/२/२, क्षेत्र ४ बीघा १३ बिस्वा यातील ३ बीघा जमिनीचा २२.०९.१९९७ रोजी ताबा घेण्यात आला होता; मात्र त्या खसरा पैकी १ बीघा १३ बिस्वा चा ताबा घेता आला नाही व जोपर्यंत खसरा क्रमांक ४०/२/२ चा संबंध आहे त्याचा ताबा घेण्यात आला नव्हता. रिट याचिका क्रमांक २५०६/१९८२ आणि ३६३१/१९८२ मध्ये स्थगिती दिल्याने जमिनीच्या काही भागाचा ताबा घेता आला नाही, अशी बाजू एलएसीच्या वतीने मांडण्यात आली होती. वरील प्रमाणे असूनही आणि प्रत्यक्ष ताबा घेण्याच्या वादात न जाता, या न्यायालयाच्या **पुणे महानगरपालिका व इतर आणि हरकचंद मिसिरीमल सोळंकी व इतर (२०१४) ३ एससीसी १८३ मध्ये प्रकाशित, या प्रकरणात दिलेल्या आधीच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेऊन** उच्च न्यायालयाने रिट याचिका मंजूर केली असून अधिनियम, २०१३ च्या कलम २४ (२) अन्वये प्रस्तुत जमिनींसंदर्भातील संपादन व्यपगत झाल्याचे जाहीर केले आहे.

३. **पुणे महानगरपालिका (उपरोल्लेखित)** या प्रकरणात बाबतीत या न्यायालयाचा निर्णय ज्यावर उच्च न्यायालयाने आक्षेपार्ह न्यायनिर्णय आणि आदेश देताना मोठ्या प्रमाणात भिस्त ठेवली

आहे, **इंदूर विकास प्राधिकरण विरुद्ध मनोहरलाल आणि इतर (२०२० ) ८ एससीसी १२९ मध्ये प्रकाशित या प्रकरणात या न्यायालयाच्या घटनापीठाने** विशेषतः नमंजूर' केली आहे आणि परिच्छेद

३६५ आणि ३६६ मध्ये या न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आहे आणि निर्णय दिला की :-

**"३६५.** परिणामी पुणे महानगरपालिका [पुणे महानगरपालिका विरुद्ध हरकचंद मिसिरीमल सोळंकी, (२०१४) ३ एससीसी १८३] मध्ये देण्यात आलेला निर्णय याद्वारे नामंजूर केला जातो आणि इतर सर्व निर्णय ज्यात पुणे महानगरपालिका [पुणे महानगरपालिका वि. हरकचंद मिसिरीमल सोलंकी, (२०१४) ३ एससीसी १८३] चे अनुसरण केले आहे, ते नामंजूर केले जातात. श्री बालाजी नगर निवासी संघ [श्री बालाजी नगर निवासी संघ विरुद्ध टी.एन.राज्य, (२०१५) ३ एससीसी ३५३] मधील निर्णय हा चांगला कायदा निर्माण करतो असे म्हणता येणार नाही, तो नामंजूर केला जाते, आणि त्यानंतरचे इतर निर्णयही नामंजूर केले जातात. इंदूर विकास प्राधिकरण वि. शैलेंद्र [(२०१८) ३ एससीसी ४१२], कलम २४ (२) मधील परंतुकाच्या संदर्भात आणि "किंवा" हे 'नाही'

म्हणून वाचावे किंवा "आणि" म्हणून वाचावे की नाही याचा पैलू विचारार्थ ठेवला गेला नाही. त्यामुळे सध्याच्या निकालातील चर्चेच्या पार्श् वभूमीवर तो निर्णयही लागू होऊ शकत नाही.

**३६६.** वरील चर्चेच्या अनुषंगाने आम्ही प्रश्नांना खालील प्रमाणे उत्तर देतो :

**३६६.१** कलम २४ (१) (अ) मधील तरतुदींनुसार, २०१३ चा अधिनियम प्रारंभ होण्याच्या तारखेपर्यंत म्हणजे १-१-२०१४ रोजी कोणताही निवाडा पारित करण्यात आला

नसल्यास, कार्यवाही व्यपगत होत नाही. २०१३ च्या अधिनियमातील तरतुदींनुसार भरपाई निर्धारित करावी लागते.

**३६६.२** न्यायालयाच्या अंतरिम आदेशाने व्यापलेला कालावधी वगळून, पाच वर्षांच्या विशिष्ट कालावधीच्या आत निवाडा पारित आला असेल, तर तो रद्द न केल्याप्रमाणे१८९४ च्या अधिनीयमांतर्गत २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४ (१) (ब) अन्वये तरतुदीनुसार कार्यवाही सुरू राहील.

**३६६.३** कलम २४(२) मध्ये ताबा आणि भरपाई दरम्यान वापरलेला"किंवा" हा शब्द "नाही" किंवा "आणि" म्हणून वाचला पाहिजे. २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(२) अन्वये भूसंपादनाच्या कार्यवाहीचे मानीव व्यपगत हे तिथे घडते जेथे प्राधिकरणाच्या निष्क्रियतेमुळे हा अधिनियम लागू होण्यापूर्वी पाच वर्ष किंवा त्याहून अधिक काळ सदर अधिनियमाच्या प्रारंभाच्यापूर्वी जमिनीचा ताबाही घेण्यात आलेला नाही किंवा नुकसान भरपाईही देण्यात आलेली नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, ताबा घेतला गेला असेल, भरपाई दिली गेली नसेल तर तेथे व्यपगत होत नाही. त्याचप्रमाणे जर भरपाई देण्यात आलेली असेल, आणि ताबा घेण्यात आला नसेल, तर तेथे व्यपगत होत नाही.

**३६६.४** २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(२) च्या मुख्य भागात 'प्रदान केलेल' या शब्दप्रयोगामध्ये भरपाई न्यायालयात जमा करण्याचा समावेश होत नाही. 'जमा न केलेले' याचा परिणाम कलम २४(२) च्या परंतुकांमध्ये दिला गेला आहे, जर बहुसंख्य भूधारणेच्या संदर्भात जर ती जमा न केल्यास १८९४ च्या अधिनियमाच्या कलम ४

अन्वये भूसंपादनासाठीच्या अधिसूचनेच्या तारखे रोजी सर्व लाभार्थी (जमीनमालक) २०१३ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार भरपाईसाठी हक्कादार असतील. भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ३१ अन्वये दायित्वाची पूर्तता न केल्यास, सदर अधिनियमाच्या कलम ३४ अन्वये व्याज दिले जाऊ शकते. भरपाई (न्यायालयात) जमा न केल्याने भूसंपादनाची कार्यवाही व्यपगत होत नाही. बहुसंख्य भूधारणेच्या संदर्भात भरपाईची रक्कम पाच वर्ष किंवा त्याहून अधिक काळ जमा केली गेली नसेल, तेव्हा १८९४ च्या अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत जमीन संपादनाकरीता अधिसूचनेच्या तारखे रोजी, २०१३ च्या अधिनियमानुसार 'जमीन मालकांना'" भरपाईची रक्कम द्यावी लागते.

**३६६.५** १८९४ च्या अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार भरपाईची रक्कम एखाद्या व्यक्तीला देऊ केली तर, २४(२) अन्वये भरपाई न दिल्यामुळे किंवा न्यायालयात जमा न केल्यामुळे संपादन व्यपगत झाल्याचा दावा करणे हे त्याच्यासाठी खुले नाही. कलम ३१ (१) नुसार रक्कम देऊन प्रदान करण्याचे दायित्व पूर्ण होते. ज्या जमीन मालकांनी भरपाई स्वीकारण्यास नकार दिला होता किंवा ज्यांनी जास्त भरपाईसाठी निर्देश मागितला होता, ते २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(२) अन्वये संपादनाची कार्यवाही व्यपगात झाल्याचा दावा करू शकत नाहीत.

**३६६.६** अधिनियम २०१३ चे कलम २४(२) चे परंतुक कलम २४ (ब) चा भाग न मानाता , कलम २४(२) चा भाग मानावा.

**३६६.७** १८९४ च्या अधिनियमांतर्गत आणि कलम २४(२) नुसार अभिप्रेत ताबा घेण्याची पद्धत म्हणजे चौकशी अहवाल /ज्ञापन काढणे आहे. १८९४ च्या अधिनियमाच्या कलम १६ नुसार ताबा घेतल्यानंतर, एकदा का निवाडा पारित केल्यानंतर, आणि जमीन राज्यास निहित केल्यानंतर, २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४ (२) अंतर्गत ते काढून घेण्याची कोणतीही तरतूद नाही, कारण एकदा का ताबा घेतल्यानंतर, कलम २४(२) अन्वये व्यपगत होणार नाही.

**३६६.८** १.१.२०१४ रोजी संबंधित प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या भूसंपादनाच्या कार्यवाहीत, २०१३चा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी, प्राधिकरणाच्या निष्क्रियतेमुळे पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळ भरपाई देण्यास प्राधिकरण अपयशी ठरले तर, कलम २४(२) च्या तरतुदी ज्या कार्यवाहीचं मानीव व्यपगत होण्याची तरतूद करतात, त्या लागू होतात. न्यायालयाने पारित केलेल्या अंतरीम आदेशाच्या अस्तित्वाचा कालावधी पाच वर्षाच्या संगनणेतून वगळण्यात यावा.

**३६६.९** २०१३ च्या अधिनियमाचे कलम २४(२) भूसंपादनाच्या समाप्त झालेल्या कार्यवाहीच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यासाठी कारवाईचे नवीन कारण उद्भवू देत नाही. कलम २४, २०१३ च्या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या तारखेला म्हणजे १.१.२०१४ ला प्रलंबित असलेल्या कार्यवाहीस लागू होते. ते शिळे किंवा मुदतबाह्य दावे पुनरुज्जीवित करत नाहीत आणि समाप्त झालेली कार्यवाही पुन्हा सुरू करत नाहीत किंवा जमीन मालकांना कार्यवाही पुन्हा सुरू करण्यासाठी ताबा घेण्याच्या पद्धतीच्या

वैधतेवर किंवा संपादन अग्राह्य ठरवण्यासाठी भरपाई न्यायालयाऐवजी कोषागारात जमा करण्याच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित करण्याची परवानगी देत नाही.

४. इंदूर विकास प्राधिकरणाच्या (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाने घालून दिलेला कायदा या प्रकरणातील वस्तुस्थितीवर लागू करून उच्च न्यायालयाने संपूर्ण जमिनी संदर्भातील म्हणजेच १५ बिघा १८ बिसवा या जमिनीच्या संपादनाची कार्यवाही व्यपगत झाल्याचे मानले असल्याचे जाहीर करून महत्त्वाची चूक केली आहे.

५. वरील बाबी लक्षात घेता आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे आणि इंदूर विकास प्राधिकरणाच्या (उपरोल्लेखित) बाबतीत या न्यायालयाने घालून दिलेला कायदा लागू केल्याने, उच्च न्यायालयाने पारित केलेला आक्षेपार्ह न्यायनिर्णय व आदेश याद्वारे रद्दबातल केला जातो. अधिनियम २०१३ च्या कलम २४(२) अन्वये प्रस्तुत जमिनींनच्या संपादन कार्यवाही संदर्भात कोणतेही मानीव व्यपगत नसेल. परिणामी, मूळ रिट याचिकाकर्त्याने (याचिकाकर्त्यांनी) उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका फेटाळली येते. मात्र, सध्याचे अपील मंजूर करताना असे मत व्यक्त करण्यात आले आहे की, मूळ जमीन मालक /अभिलिखित मालक किंवा हीतसंबंधित व्यक्तीला भरपाई न दिल्यास त्यांना प्रस्तुत जमिनीसंदर्भातील भरपाई भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील तरतुदीनुसार आणि त्यांच्या प्रार्थनेचा कायद्यानुसार आणि त्यांच्या स्वतःच्या गुणवत्तेनुसार विचार केला जावा.

त्यानुसार प्रस्तुतचे अपील मंजूर केले जाते. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

प्रलंबित अर्ज, काही असल्यास, तेही निकाली काढण्यात येत आहेत.

**x-x-x-x-x-x**

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्यामातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातीलआदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x-x-x**